Model Question Paper for Internal Practical Examination (20 Marks)

मुक्त कृषि शिक्षण केंद्र

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

मुक्त कृषि शिक्षण केंद्राचे नावः ----------

AGR 201 : **मृदशास्त्राची मूलतत्त्वे आणि कार्यपद्धती (प्रात्यक्षिक परीक्षा)**

दिनांक : --.--.---- **गुण : 20** **वेळ : 14.00 ते 15.30**

विभाग (A) : **आपणास देण्यात आलेल्या प्रयोगाची/प्रात्यक्षिकाची सविस्तर कार्यपद्धती लिहून सदरचा प्रयोग/प्रात्यक्षिक प्रत्यक्ष करून दाखवा. ..... गुण : 10**

प्रात्यक्षिक 01 :खडकांचे प्रकार ओळखून त्यापासून निर्माण होणाऱ्या जमिनीचे गुणधर्म ओळखणे.

प्रात्यक्षिक 02 :खनिजांचे प्रकार ओळखून कोणत्या खनिजांच्या आस्तित्वामुळे जमिनीच्या कोणत्या गुणधर्मावर कोणता परिणाम होतो ते ओळखणे.

प्रात्यक्षिक 03 :जमिनीच्या उभ्या छेदाचा अभ्यास करणे.

प्रात्यक्षिक 04 :जमिनीचे पृथक्करण करण्यासाठी मातीचा नमुना घेणे.

प्रात्यक्षिक 05 :मातीच्या नमुन्यातील पाण्याचे (ओलाव्याचे) प्रमाण काढणे.

प्रात्यक्षिक 06 :मातीची सच्छिद्रता, पोत आणि प्रकार तपासणे.

प्रात्यक्षिक 07 :जमिनीचा सामू व विद्युतवाहकता मोजणे.

प्रात्यक्षिक 08 :जमिनीतील उपलब्ध नत्राचे प्रमाण काढणे.

प्रात्यक्षिक 09 :जमिनीतील उपलब्ध स्फुरदाचे प्रमाण काढणे.

प्रात्यक्षिक 10 :जमिनीतील उपलब्ध पालाशाचे प्रमाण काढणे.

प्रात्यक्षिक 11 :कंपोस्टखत तयार करणे.

प्रात्यक्षिक 12 :गांडूळखत तयार करणे.

प्रात्यक्षिक 13 :निळेहिरवे शेवाळयुक्त खत तयार करणे.

प्रात्यक्षिक 14 :माती परीक्षण अहवाल वाचन करून त्यानुसार विविध पिकांसाठी खतांच्या मात्रा ठरविणे.

प्रात्यक्षिक 15 :रासायनिक खतांचे अन्नद्रव्यांच्या प्रकारानुसार वर्गीकरण करणे.

प्रात्यक्षिक 16 :सेंद्रिय खतांचे अन्नद्रव्यांच्या प्रमाणानुसार वर्गीकरण करणे.

प्रात्यक्षिक 17 :पिकांमधील मुख्य अन्नद्रव्यांच्या कमतरता लक्षणांचा अभ्यास करणे.

प्रात्यक्षिक 18 :पिकांमधील दुय्यम अन्नद्रव्यांच्या कमतरता लक्षणांचा अभ्यास करणे.

प्रात्यक्षिक 19 :पिकांमधील सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या कमतरता लक्षणांचा अभ्यास करणे.

प्रात्यक्षिक 20 :हिरवळीच्या खतांचा अभ्यास करणे.

विभाग (B) :आपणासमोर ठेवलेल्या नमुन्याबाबत त्यासोबत विचारलेल्या प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (एका प्रश्नासाठी 0.5 गुण आहे) ..... गुण : 10

01. लाल माती : प्रश्न 1 : या मातीला कोणत्या मूलद्रव्यांमुळे लाल रंग येतो?
प्रश्न 2 : अशा प्रकारच्या जमिनी कोणत्या प्रदेशात आढळतात?

02. गांडूळखत : प्रश्न 1 : या खताचा प्रकार लिहा.
प्रश्न 2 : खत तयार होण्यासाठी किती दिवसांचा कालावधी लागतो?

03. पी. एच. मीटर : प्रश्न 1 : या उपकरणाचा उपयोग कशासाठी करतात?
प्रश्न 2 : या उपकरणाची कमाल मोजमाप मर्यादा किती आहे?

04. डी.ए.पी. रासायनिक खत : प्रश्न 1 : या खताचा प्रकार लिहा.
प्रश्न 2 : या खतामधील अन्नघटकांचे शेकडा प्रमाण लिहा.

05. वाळूसर माती : प्रश्न 1 : या मातीची जलधारणा शक्ती कशी असते?
प्रश्न 2 : अशा प्रकारच्या जमिनीत कोणती पिके घेतात?

06. हिरव्या शिरा असलेले पिवळ्या रंगाचे पान : प्रश्न 1 : कोणत्या अन्नद्रव्याच्या कमतरतेमुळे अशी लक्षणे दिसतात?
प्रश्न 2 : या रोगाच्या नियंत्रणासाठी कोणती उपाययोजना करावी?

07. विद्युतवाहकता मापन यंत्र : प्रश्न 1 : या उपकरणाचा उपयोग कशासाठी करतात?
प्रश्न 2 : या उपकरणामार्फत करावयाच्या मोजमापाचे एकक द्या.

08. रायझोबियम खताचे पाकीट : प्रश्न 1 : या खताच्या वापरामुळे पिकांच्या मुळांवर कोणता दृश्य परिणाम दिसतो?
प्रश्न 2 : हे खत कोणत्या वर्गातील पिकांसाठी वापरतात?

09. युरिया : प्रश्न 1 : या खतामधील नत्र, स्फुरद व पालाश या अन्नघटकांचे शेकडा प्रमाण लिहा.
प्रश्न 2 : या खताचा प्रकार लिहा.

10. भुईमूग पेंड : प्रश्न 1 : हे सेंद्रिय खत कोणत्या पिकापासून तयार करतात?
प्रश्न 2 : या सेंद्रिय खतामध्ये कोणत्या अन्नद्रव्याचे प्रमाण अधिक असते?